महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदूर्ग
Government Medical College & Hospital, Sindhudurg
Near Civil Hospital, A/P.Oras, Ta.-Kudal, Dist. Sindhudurg
Phone No.(02362 228355) E-mail ID- deangmcsindhudurg@gmail.com

जा.क्र.शावैमवरुसिं/वाहतुक सेवा/दरपत्रके/५१४२ /२०२५ दि.१५/१२/२०२५

# संस्थेच्या संकेतस्थळावरुन दरपत्रके मागणी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग येथील एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांकरीता वसतीगृह ते महाविद्यालय (ने-आण करण्याचे दिवसाचे एकुण ६८ कि.मी. अंतर अपेक्षित आहे) ने-आण करणेकरीता वाहन सेवा उपलब्ध करणेबाबत दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरची वाहन सेवा संबंधित अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

अटीव शर्ती-

१) दरपत्रक भरणाऱ्या व्यक्तिकडे पॅनकार्ड, आधारकार्ड आवश्यक आहे.

२) राष्ट्रीयकृत बँकमध्ये सक्रिय असलेले बँक खाते आवश्यक.

३) दरपत्रके ही जी.एस.टी रक्कमेसह सादर करणेत यावीत.

४) पुरवठादाराने पुरविण्यात येणाऱ्या वाहनाचा दर्जा सर्वोत्तम असावा.

५) वाहनाची नोंदणी, आरसी बुक, आरटीओ मान्यता तसेच वाहन चालकाजवळ आरटीओ ऑफिसच्या नियमानुसार सर्व आवश्यकती कागदपत्रे उपलब्ध असावीत.

६) दरपत्रक दिलेल्या नमुण्यात सीलबंद लिफाफ्यावर खालील प्रमाणे लिहावे.
त्यावर नाव नमुद करुन "एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांकरीता वसतीगृह ते महाविद्यालय ने-आण करणेकरीता वाहन सेवा उपलब्ध करणेबाबत" असा उल्लेख करुन दरपत्रकाचे अंतिम दिनांक २६.१२.२०२५ असे नमूद करावे. सदर लिफाफा दिनांक २६.१२.२०२५ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सिंधुदुर्ग. यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पोस्टाने किंवा हस्तपोच सादर करावे. सदर लिफाफ्यामध्ये तांत्रिक लिफाफा (Technical Envelope) व व्यापारी लखोटा (Financial Envelope) स्वतंत्र पाठविण्यात यावेत. उशीरा प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. कोणताही लिफाफा स्वीकारणे अथवा नाकारणे याचे सर्व अधिकार मा. अधिष्ठाता यांना राहतील.

Govt. Medical College and Hospital Sindhudurg

१५.१२.२०२५

डॉ. अनंत डवंगे
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
सिंधुदुर्ग.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय
सिंधुदुर्ग.

प्रति,
श्री. विलास राठोड, उच्चश्रेणी लघुलेखक, यांना कळविण्यात येते की वरील सेवेचे प्रसिध्दिपत्रक या संस्थेच्या संकेतस्थळावर दिनांक १५.१२.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात यावे.